

कोल्हापूर : कुलगुरू देवानंद शिंदे यांच्या मातोश्री श्रीमती नागरबाई शिंदे यांनी कचरावेचक महिलांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप केले.

# कुलगुरूंच्या मातोश्रींकडून कचरावेचक महिलांना मदत

कोल्हापूर, ता. ३ : कोरोनामुळे झालेल्या लॉकडाउनमध्ये हाताला मिळणारे काम बंद झाल्याने हलाखीत जीवन कंठणाऱ्या कचरावेचक महिलांना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या मातोश्री नागरबाई बाबूराव शिंदे यांनी मदतीचा हात दिला. श्रीमती शिंदे यांनी पतीच्या पेन्शनच्या साठवलेल्या पैशातून जीवनावश्यक वस्तूंचे कीट या महिलांना दिले. श्रीमती नागरबाई शिंदे यांना पतीची पेन्शन मिळते. काही गरजू महिलांना मदत करण्याची भावना त्यांनी व्यक्त केली. त्यानुसार अवनी संस्थेंतर्गत काम करणाऱ्या कचरावेचक महिलांना मदत करण्याचे ठरले. त्यानुसार महाराष्ट्र दिनानिमित्त विद्यापीठ परिसरात सोशल डिस्टन्सिंगचे पालन करत कचरावेचक महिलांना जीवनावश्यक वस्तूंचे कीट वितरित करण्यात आले. समाजातील एकही गरीब, गरजू उपाशी राहू नये, त्यांना प्रत्येकाने क्षमतेप्रमाणे मदत करावी, असे आवाहन श्रीमती शिंदे यांनी केले. यावेळी अवनी संस्थेच्या उपाध्यक्ष अनुराधा भोसले, समन्वयक जैनुद्दीन पन्हाळकर, लक्ष्मी कांबळे, भारती कोळी, पिंकी चव्हाण, आक्काताई गवळी उपस्थित होत्या.

लोकमत

## शिवाजी विद्यापीठाच्या समितीला प्रतीक्षा : नव्या शैक्षणिक सत्राची होणार निश्चिती

# समितीच्या अहवालानंतरच परीक्षांची 'वेळ'

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : राज्य शासनाने स्थापन केलेल्या समितीच्या अहवालानंतरच शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षांचे वेळापत्रक आणि नव्या शैक्षणिक सत्राचा प्रारंभ निश्चित होणार आहे. विद्यापीठाच्या १८ सदस्यीय समितीला या अहवाल आणि शासनाच्या निर्देशांची प्रतीक्षा लागली आहे.

राज्यातील विद्यापीठ आणि महाविद्यालयीन स्तरावरील परीक्षा कोणत्या पद्धतीने घ्याव्यात, याबाबतचा अहवाल देण्यासाठी राज्य शासनाने सहा सदस्यीय समिती स्थापन केली आहे. ही समिती राज्यातील सर्व विद्यापीठांच्या कुलगुरूंची चर्चा करुन त्यांची मते आणि सूचना जाणून घेऊन शासनाला अहवाल सादर करणार आहे. या समितीच्या अहवालातील शिफारशी, शासनाचे निर्देश आणि कोरोनाच्या पार्श्वभूमीवरील स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन विद्यापीठनिहाय परीक्षांचे वेळापत्रक आणि शैक्षणिक सत्र निश्चित होणार आहे. शिवाजी विद्यापीठाच्या १८ सदस्यीय समितीची पहिली बैठक शनिवारी (दि. २) ऑनलाईन झाली. त्यामध्ये सकाळी ९ ते ११, दुपारी १२ ते १ आणि दुपारी ३ ते ५ या वेळांमध्ये पेपर घेण्याचा विचार आणि चर्चा या समितीने केली आहे.

### चार दिवसांत राज्य समितीचा अहवाल

सध्या राज्यातील विविध विद्यापीठांच्या कुलगुरुंसमवेत समिती सदस्यांची चर्चा सुरु झाली आहे. ती पूर्ण झाल्यानंतर अहवाल तयार करुन तो राज्य शासनाला सादर करण्यात येईल. त्यासाठी तीन ते चार दिवस लागणार असल्याचे राज्य समितीतील सदस्य कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी रविवारी सांगितले.

Kolhapur Main
Page No. 2 May 04, 2020
Powered by: erelego.com

पुढारी

# कुलगुरूंच्या मातोश्रींकडून कचरावेचक महिलांना मदत

## पतीच्या पेन्शनमधून जीवनावश्यक वस्तूंचे वाटप

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोरोना विषाणू साथीच्या प्रादुर्भावामुळे हाताला मिळणारे काम बंद झाल्याने हालाखीत जीवन कंठणाऱ्या कचरावेचक महिलांना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या मातोश्री नागरबाई बाबुराव शिंदे यांनी मदतीचा हात दिला. श्रीमती शिंदे यांनी पतीच्या पेन्शनमधून साठविलेल्या पैशातून जीवनावश्यक वस्तूंचे किट या महिलांना वाटप करून वयाच्या ९० व्या वर्षी सामाजिक बांधीलकीची प्रचिती दिली आहे.



**कोल्हापूर : अवनि संस्थेअंतर्गत काम करणाऱ्या कचरावेचक महिलांना जीवनावश्यक वस्तूंच्या किटचे वाटप करताना श्रीमती नागरबाई शिंदे.**

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर गेल्या काही दिवसांपासून राज्यात लॉकडाऊन आहे. परिणामी जनजीवन विस्कळीत झाले आहे. प्रशासन, सामाजिक संस्था, संघटनांकडून गरजूंना जीवनावश्यक साहित्याचे वाटप सुरु आहे. श्रीमती नागरबाई शिंदे यांनी सध्याच्या प्रतिकूल परिस्थितीत काही गरजू महिलांना मदत करण्याची भावना व्यक्त केली. त्यानुसार 'अवनि' संस्थेअंतर्गत काम करणाऱ्या कचरावेचक महिलांना मदत करण्याचे ठरले. त्यानुसार महाराष्ट्र दिनानिमित्त विद्यापीठ परिसरात सोशल डिस्टन्सिंगचे पालन करीत मोजक्या लोकांच्या उपस्थितीत कचरावेचक महिलांना जीवनावश्यक वस्तूंचे किट वितरित करण्यात आले.

यावेळी अवनि संस्थेच्या उपाध्यक्षा अनुराधा भोसले, समन्वयक जैनुद्दीन पन्हाळकर, लक्ष्मी कांबळे, भारती कोळी, पिंकी चव्हाण, आक्कातांई गवळी यांच्यासह कचरावेचक महिला उपस्थित होत्या.

# तुकडोजी महाराजांना विद्यापीठात अभिवादन

कोल्हापूर : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात गुरुवारी त्यांच्या स्मृतींना अभिवादन



करण्यात आले. सकाळी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे व प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, समाजशास्त्र अधिविभागाचे डॉ. प्रल्हाद माने उपस्थित होते.

लोकमत

# कचरावेचक महिलांना शिंदे यांचा मदतीचा हात

**कोल्हापूर :** 'लॉकडाऊन'मुळे काम बंद असल्याने कचरावेचक महिलांची आर्थिक अडचण झाली आहे. त्यांना कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या आई नागरबाई शिंदे यांनी मदतीचा हात दिला. नागरबाई यांनी पतीच्या पेन्शनमधून साठवलेल्या पैशातून जीवनावश्यक वस्तूंचे किट या महिलांना वाटप करुन सामाजिक बांधीलकी जोपासली.

नागरबाई यांचे वय ९० वर्षे असून त्यांना पतीची पेन्शन मिळते. सध्याच्या प्रतिकूल परिस्थितीत काही गरजू महिलांना मदत करण्याची भावना त्यांनी व्यक्त केली. त्यानुसार 'अवनि' संस्थेंतर्गत काम करणाऱ्या कचरावेचक महिलांना जीवनावश्यक वस्तूंचे किट वितरित करण्यात आले. यावेळी अनुराधा भोसले, जैनुद्दीन पन्हाळकर, लक्ष्मी कांबळे, भारती कोळी आदी उपस्थित होत्या.

Hello Kolhapur
Page No. 2 May 04, 2020
Powered by: erelego.com

# विद्यापीठाला राज्य समितीच्या अहवालाची प्रतीक्षा

कोल्हापूर : युजीसीच्या परीक्षांसंदर्भात मार्गदर्शक सूचना आल्या आहेत; मात्र अद्याप राज्य सरकारने स्थापन केलेल्या राज्य समितीच्या सूचना आलेल्या नाहीत. त्या आल्यानंतरच विद्यापीठांचे परीक्षा वेळापत्रक ठरणार आहे. त्यामुळे विद्यापीठाच्या परीक्षा समितीला राज्य समितीच्या अहवालाची प्रतीक्षा आहे. पुढील तीन ते चार दिवसांत हा अहवाल उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांना सादर केला जाईल. राज्य सरकारने राज्यातील विद्यापीठांच्या परीक्षांसाठी कुलगुरूंची स्वतंत्र समिती नेमली आहे. परीक्षा तयारीचा आढावा घेण्यासाठी विद्यापीठामध्येही परीक्षा समिती नेमली असून, या समितीची पहिली बैठक झाली. राज्य समितीच्या मार्गदर्शक सूचना आल्यानंतर विद्यापीठांच्या जुलैमध्ये होणाऱ्या परीक्षांचे वेळापत्रक ठरणार आहे.

# आठवड्यात सुटणार परीक्षांचा पेच

## समितीच्या मार्गदर्शक सूचनांनंतरच विद्यापीठाचा निर्णय



म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

करोनाची साखळी रोखण्यासाठी गेल्या दीड महिन्यांपासून लॉकडाउन असल्याने विद्यापीठ व महाविद्यालयांच्या २७ मार्चपासून सुरू होणाऱ्या परीक्षा स्थगित करण्यात आल्या होत्या. या परीक्षांबाबत विद्यापीठ अनुदान आयोग यूजीसीने केंद्र सरकारला केलेल्या शिफारशींच्या पार्श्वभूमीवर राज्यस्तरीय समितीच्या मार्गदर्शक सूचनानंतरच शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षांचा पेच सुटणार आहे, अशी माहिती विद्यापीठ परीक्षा समितीचे अध्यक्ष डॉ. धनाजीराव कणसे यांनी दिली. येत्या तीन दिवसात परीक्षांबाबत तोडगा निघेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

विद्यापीठ परीक्षा घेण्याच्या पर्यायी पद्धतींबाबत गेल्या १५ दिवसांपूर्वी विद्यापीठ अनुदान समितीने शिफारशीचा अहवाला केंद्र सरकारला सादर केला आहे. यामध्ये जुलै ते ऑगस्ट या दोन महिन्यांच्या कालावधीत परीक्षा घेऊन सप्टेंबर महिन्यापासून शैक्षणिक सत्र सुरू करण्याची महत्त्वाची शिफारस करण्यात आली आहे.

यूजीसीने केलेले वेळापत्रक व परीक्षा पद्धतीबाबत केंद्र सरकारसोबत चर्चा झाली आहे. मात्र यासंदर्भात राज्यस्तरावर जोपर्यंत यूजीसीचे मार्गदर्शक तत्वे स्वीकारण्याबाबत आदेश येत नाहीत तोपर्यंत शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा घेण्याबाबतचा निर्णय घेता येत नाही.

राज्यस्तरीय समितीला विद्यापीठ परीक्षांच्या नियोजनाचा अहवाल सादर करण्याबाबत २ मे रोजी शिवाजी विद्यापीठातर्फे स्थापन केलेल्या १८ सदस्यीय समितीची ऑनलाइन बैठक घेण्यात आली. या बैठकीत दिवसभरात तीन सत्रांत परीक्षा घेण्याचा विचार मांडण्यात आला आहे. विद्यापीठाच्या ६८० विषयांचे पेपर कमीत कमी वेळेत घेण्याबाबतही चर्चा झाली.

दरम्यान विद्यापीठ अनुदान आयोगाने नेमलेल्या समितीच्या शिफारशीच्या पाठोपाठ विद्यापीठाला राज्य सरकारने नेमलेली समिती काय शिफारस करते याकडे लक्ष लागले आहे.

### साताऱ्याबाबत संदिग्धता

करोनाबाधित रुग्णांच्या संख्येनुसार राज्याचे वर्गीकरण तीन झोनमध्ये करण्यात आले आहे. यामध्ये परीक्षांचे नियोजन करताना शिवाजी विद्यापीठाच्या अखत्यारीत येणाऱ्या कोल्हापूर, सांगली व सातारा या तीन जिल्ह्याच्या झोन वर्गीकरणाचा निकषही महत्त्वाचा ठरणार आहे. कोल्हापूर व सांगली ऑरेंज झोनमध्ये तर सातारा रेड झोन मध्ये आहे. विद्यापीठाच्या परीक्षा घेण्याबाबत अंतिम निर्णय घेताना कोल्हापूर व सांगली जिल्ह्यासाठी ऑरेंज झोनचे नियम लागू होणार असून साताऱ्यासाठी रेड झोनच्या नियमांचे बंधन असेल. त्यामुळे रेड झोन साताऱ्याबाबत विद्यापीठ परीक्षांच्या निर्णयाचे निकष कसे लागू करायचे याबाबतही अद्याप पेच कायम आहे.